FORMAT EX – 27

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

क्र. परीक्षा / उन्हाळी / 2018 / १३६६-अ
दिनांकः २८।९।२०१८

प्रति

1. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये,
2. सर्व विभाग प्रमुख, शैक्षणिक विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
3. प्राचार्य, बॅरि. एस.के. वानखेडे शिक्षण महाविद्यालय / डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय (शहर व मुख्य शाखा), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
4. संचालक, लक्ष्मीनारायण तांत्रिक संस्था, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
5. संचालक, व्यवसाय प्रबंधन विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**विषयः उन्हाळी 2018 परीक्षेकरिता आवेदनपत्रे स्विकारण्याकरीता विहित केलेली पध्दत.**

**संदर्भः अधिसूचना क्रमांक रातुमनावि / परीक्षा / उन्हाळी / 2018 / १३६६/ ...दि... २८।९।२०१८**

महोदय / महोदया,

विद्यापीठ अध्यादेष क्र. 19 / 2008 चे अनुषंगाने उन्हाळी 2018 परीक्षेसाठी बसणाऱ्या सर्व वर्गवारीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे आपल्या महाविद्यालयात / विद्यापीठ शैक्षणिक विभागात, विद्यापीठाने घोषित केलेल्या अंतिम तारखेनुसार स्विकारावयाचे आहेत. आवेदनपत्रे स्विकारण्याचे काम ज्या कर्मचाऱ्यांकडे सोपविले आहे त्यांना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याविषयी कृपया सूचित करावे. परीपूर्ण असलेल्या आवेदनपत्राची दिलेल्या सूचनेनुसार तपासणी करण्यास बाध्य करावे. या कामासाठी बहिःशाल व माजी विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्काव्यतिरिक्त नियमाप्रमाणे अतिरिक्त सेवा शुल्क रु. 40 /– आकारण्यात येऊन तृतीय व चतुर्थ श्रेणीतील जे कर्मचारी काम सांभाळतील त्यांना हा मेहनताना देण्यात यावा.

## अति महत्वाच्या सूचना

1. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी सुधारीत नमुन्यातीलच आवेदनपत्र सादर केले आहे, याची खात्री केल्याशिवाय आवेदनपत्र स्विकारु नये. **तसेच तृतीय वर्षातील नियमित प्रवेशित वार्षीक परीक्षेशी संबंधित सर्व विद्यार्थ्यांनी तसेच सेमिस्टर पध्दतीच्या सर्व विद्यार्थ्यांनी अधिसूचना क्र. RTMNU/A.N./Pariksha/D-12/1366, दिनांक 29.8.2012 आणि क्र. RTMNU/COE/1367, दिनांक 29.8.2012 मध्ये नमुद Online पध्दतीने परीक्षा आवेदनपत्रे जमा करावे.**
2. विद्यार्थी ज्या परीक्षेसाठी आवेदनपत्र सादर करीत आहे, त्या परिक्षेसंबधी अध्यादेश, निर्देश इत्यादींचा व्यवस्थितपणे अभ्यास करून सदर विद्यार्थी त्या परीक्षेसाठी पात्र आहे किंवा नाही याची खात्री केल्याशिवाय आवेदनपत्रे स्विकारु नयेत. अपात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र स्विकारल्यास, त्यानंतरच्या परिणामाची जबाबदारी सर्वस्वी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.